# प्र. विसरभोळे

डॉ. ज यं त ना र ळी क र



❑ ❑ एक गणितज्ज्ञ विसरभोळेपणासाठी प्रसिद्ध होते. एकदा कॉलेजला जाण्यापूर्वी त्यांना त्यांच्या बायकोने बजावून सांगितले, 'आज आपण घर बदलत आहोत. संध्याकाळी परत याल तेव्हा येथे येऊ नका. हा पत्ता टॅक्सीवाल्याला द्या. तो तुम्हाला नव्या घरी आणून सोडेल.'

❑ ❑ संध्याकाळपर्यंत गणितज्ज्ञ महाशय अर्थातच हे सर्व विसरून सवयीप्रमाणे जुन्या घरीच परतले. पाहतात तो घराला कुलूप व आत अंधार! आता काय करायचे? इतक्यात त्यांनी पाहिले की, बाहेर एक दहा वर्षांचा

मुलगा उभा आहे. त्यांनी त्याला बोलावून विचारले, 'मुला, इथे राहणारे लोक कुठे गेले?'

❑ ❑ तो मुलगा उत्तरला, 'बाबा तुमचीच वाट पाहतोय. तुम्ही इकडेच याल, असे आईला वाटले, म्हणून तिने मला इथेच थांबायला सांगितले. मी नेतो तुम्हाला नव्या घरी!'

☺☺



(ही गोष्ट प्रख्यात गणितज्ञ प्रा. नॉर्बर्ट वीनर संबंधी सांगितली जाते.)

- **जयंत नारळीकर,** आय. यू.सी.सी.ए. पुणे विद्यापीठ आवार, गणेशखिंड, पुणे - ४११ ००७